शुक्रवार दि. १८ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक १८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना महापालिका बरखास्त करा; मुख्यमंत्र्यांकडे मागणी करणार

### नगरसेवकांमधील सातत्याच्या वादाचा शहराच्या विकासावर परिणाम होत असल्याचा खासदार डॉ. कल्याण काळे यांचा आरोप; काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेतील कारभारावरून काँग्रेसचे खासदार डॉ. कल्याणराव काळे यांनी सत्ताधारी व्यवस्थेवर जोरदार निशाणा साधला आहे. महानगरपालिकेतील नगरसेवकांमध्ये सातत्याने वाद-विवाद आणि भांडणे सुरू असून, या अंतर्गत संघर्षाचा परिणाम शहरातील विकासकामे आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर होत असल्याचा आरोप त्यांनी केला. ''जालना महानगरपालिका बरखास्त करावी,'' अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे करणार असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी गुरुवारी (दि. १७) स्पष्ट केले.

जालना शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने मामा चौक, जुना जालना येथील स्वास्तिक भोजनालयात नवनियुक्त शहर काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आगामी काळात शहरातील संघटन मजबूत करण्याबरोबरच नागरिकांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.



**'महापालिका विकासाचे केंद्र; पण अंतर्गत वादामुळे कामकाज प्रभावित'**

खासदार डॉ. कल्याण काळे म्हणाले की, महानगरपालिका ही शहराच्या विकासाची प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्था आहे. नागरिकांना पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, पथदिवे आणि इतर मूलभूत सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. मात्र महापालिकेतील अंतर्गत वाद आणि नगरसेवकांमधील संघर्षामुळे नागरिकांमध्ये नाराजी निर्माण होत असल्याचा दावा त्यांनी केला.

शहराच्या विकासाला अपेक्षित गती मिळण्याऐवजी महापालिकेतील राजकीय आणि अंतर्गत संघर्ष चर्चेचा विषय ठरत असेल, तर त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. त्यामुळे महापालिकेच्या कारभाराबाबत गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली असल्याचे डॉ. काळे यांनी नमूद केले.

''महापालिकेतील परिस्थितीबाबत मुख्यमंत्री यांची भेट घेऊन महापालिका बरखास्त करण्याची मागणी करणार,'' असे त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, १६ सप्टेंबर रोजी महापालिकेच्या महापौर दालनात पुन्हा वाद झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. या घटनेत महापौरांचे पुत्र रणजित मगरे आणि सभापती कपिल भुरेवाल यांच्यात वाद झाल्याची माहिती प्रसिद्ध वृत्तात देण्यात आली असून, या घटनेत पोलिसांचा हस्तक्षेप झाल्याचेही वृत्त आहे. *(पान २ वर)*

## पत्रकार आशिष रसाळ यांचे निधन

**जालना – प्रतिनिधी**

जालना शहरातील मुक्त पत्रकार तसेच निवेदक आशिष वामनराव रसाळ यांचे बुधवारी रात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ४१ वर्षाचे होते. शालेय व महाविद्यालयीन जीवनापासूनच वादविवाद स्पर्धा, वकृत्व स्पर्धेत सहभाग घेत त्यांनी अनेक पारितोषिके पटकावली होती. जालना शहरातील काही स्थानिक वृत्तपत्रात त्यांनी पत्रकार म्हणून कार्य केले. विविध समारंभातून निवेदक म्हणून ते पुढे आले होते.



बुधवारी रात्री सव्वा अकरा वाजता त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला व त्यातच त्यांचे निधन झाले. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील उंद्री येथे आज दुपारी त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी असा परिवार आहे. दरम्यान, आमदार अर्जुन खोतकर यांनी आज दुपारी रसाळ यांच्या जालना शहरातील सोनलनगर येथील निवासस्थानी जावून त्यांचे पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले.

## मराठवाडा मुक्तीसंग्रामात जालना जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

### मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त हुतात्मा स्मारकास अभिवादन; जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या मुक्तीसाठी झालेल्या ऐतिहासिक संग्रामात जालना जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. या लढ्यातील हुतात्मे, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाचे स्मरण आजही जालना जिल्ह्याच्या इतिहासात अभिमानाने केले जात असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जनतेला उद्देशून शुभेच्छा संदेश देताना त्या बोलत होत्या. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार हिकमत उढाण, माजी



आमदार राजेश टोपे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, महानगर पालिका आयुक्त अंजली शर्मा, पोलिस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल, अपर पोलीस अधिक्षक विक्रम साळी, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल पुढे म्हणाल्या की, मराठवाडा मुक्तीसंग्रामात जालना जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. परतूर येथे झालेल्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाला या लढ्याच्या इतिहासात विशेष महत्त्व आहे. कोलते पिंपळगावकरांनी २२ जून १९४८ *(पान २ वर)*

## सोमवारपासून जालना शहरात सिटी बस धावणार आमदार अर्जुन खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी असून, सोमवारपासून शहरात सिटी बस सेवा सुरू होणार असल्याची माहिती शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली. आज १७ सप्टेंबर रोजी आमदार अर्जनराव खोतकर यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रक सपकाळ मॅडम व आगार प्रमुख जैवळ यांच्यासोबत बैठक घेऊन जालना शहरात शहर बस वाहतूक सुरू होणे कसे महत्वाचे आहे हे निदर्शनास आणून दिले व तातडीने बैठकीदरम्यान सोमवारपासून जालना शहरात सिटी बस सेवा सुरू करण्यासाठी सुचणार केल्या. शहरातील नागरिक, विद्यार्थी ,कामगार शेतकरी,प्रवासाची गैरसोय लक्षात घेऊन सिटी बस सेवा सुरू करण्यासाठी



आमदार अर्जुनराव खोतकर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच जिल्हाधिकारी जालना,पोलीस अधीक्षक यांच्याशी संपर्क साधून पाठपुरावा केला. त्यांच्या या महत्त्वाकांक्षी प्रयत्नांनंतर सोमवारपासून सिटी बस सेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले.

प्राथमिक माहितीनुसार,

**बस स्टॅन्ड -भोकरदन नाका -जालना बाजार समिती -कन्हैया नगर - गणपती नेत्रालय -जे एस महाविद्यालय -एस आर पी एफ - मंठा चौफुली - जिल्हाधिकारी कार्यालय - मोतीबाग विशाल कॉर्नर - एमआयडीसी - नागेवाडी काकडे पेट्रोल पंप**

**बस स्टँड - विशाल कॉर्नर - मोतीबाग- जिल्हाधिकारी कार्यालय - अंबड चौफुली - मंठा चौफुली - रामनगर साखर कारखाना**

**बस स्टॅन्ड- मुथा बिल्डिंग - मंमादेवी - गांधी चव्हाण - रेल्वे स्टेशन - नूतन वसाहत - अंबड चौफुली - इंदेवाडी पाण्यात टाकी**

या मार्गावर सिटी बस सेवा धावणार आहे.सिटी बस सुरू झाल्यामुळे शहरातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या सिटी बस सेवेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केलेल्या पाठपुराव्याचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

या बैठकीला शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांचीही उपस्थिती होती.

## सुयश कॉलेज ऑफ फार्मसीत १६ सप्टेंबर रोजी दीक्षांत समारंभ संपन्न

**दत्ता देशमुख**

जिजामाता ग्रामीण विकास व शिक्षण संस्था, जाफराबाद संचलित सुयश कॉलेज ऑफ फार्मसी, वरूड बु., ता. जाफ्राबाद , जि. जालना येथे बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ रोजी पदवीधर विद्यार्थ्यांसाठी दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या समारंभात बॅचलर ऑफ फार्मसी (.) अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला . विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा सन्मान करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सौ. सुरेखाताई संजय लहाने,



अध्यक्ष, जिजामाता ग्रामीण विकास व शिक्षण संस्था, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अमित आरसोडे तसेच श्री. विलासअप्पा शिंदे, सरपंच, वरूड बु. तसेच संस्थेतर्फे सुयश भैय्या लहाने यांची उपस्तिती लक्षनीय ठरली. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व स्वागत गीताने करण्यात आली. प्रस्ताविक प्राध्यापक रवींद्र मापारी यांनी केले. तसेच विद्यार्थी शिक्षक व प्राचार्य डॉ विजय पवार व प्रमुख पाहुण्यांनी या कार्यक्रमाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा आणि शैक्षणिक *(पान २ वर)*

## जिल्हा परिषदेत मानवी रांगोळीद्वारे 'सेवा संकल्प अभियान' ची सुरुवात

**जालना - प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या कारकिर्दीनिमित्त तसेच सामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय सेवा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ जलदगतीने पोहोचवण्यासाठी राज्य शासनाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर सेवा संकल्प अभियान राबवण्याचा निर्णय घेतला आहे. जालना जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' या देशव्यापी जिल्हास्तरीय अभियानाची सुरुवात आज येथील जिल्हा परिषदेत मानवी साखळी व



रांगोळी उपक्रमाच्या माध्यमातून उत्साहात करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया, परिविक्षाधीन अधिकारी आर. रंगामंजू, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, मुख्य लेखा वित्त अधिकारी राधाकिसन राऊत यांच्यासह जिल्हा परिषदेतील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने राष्ट्रीय प्रतिके आणि विकसित भारताची संकल्पना या विषयावर आधारीत मानवी रांगोळीचा *(पान २ वर)*

## अपघातप्रवण स्थळांवरील सुरक्षा कामे तातडीने पूर्ण करा जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत संबंधित यंत्रणांना निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अपघातप्रवण स्थळांवरील (ब्लॅक स्पॉट) रस्ता सुरक्षा उपाययोजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी संबंधित यंत्रणांना दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात दि.१६ रोजी आयोजित जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. पोलीस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, सार्वजनीक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर कोल्हे, सार्वजनीक बांधकाम विभाग कार्यकारी विभाग २ चे कार्यकारी अभियंता व्यं.ना. मिठ्ठेवाड, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे वाहतुक निरिक्षक आ. अ. सोनवणे, विद्युत अभियंता के.बी. गावंडे, पोलीस निरिक्षक सुरेश उणवणे आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणल्या की, रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्ता स्पष्ट दिसावा, यासाठी आवश्यक ठिकाणी प्रकाश व्यवस्था करावी. तसेच जिल्ह्यातील विविध ब्लॅक स्पॉटवर सुरू असलेल्या तसेच प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील २६ अपघातप्रवण स्थळांवर फ्लड लाईट बसविण्याबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ व २ यांनी अंदाजपत्रक आणि प्रस्ताव तातडीने सादर करून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.अपघातप्रवण ठिकाणांच्या परिसरातील विहिरींच्या सुरक्षेचाही आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांनी विहिरींभोवती आवश्यक सुरक्षा उपाययोजनांसाठी अंदाजपत्रक तयार करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

स्पीड ब्रेकर, सूचना फलक बसविणे, विविध ठिकाणी नवीन स्पीड ब्रेकर बसविणे, खराब झालेले स्पीड ब्रेकर बदलणे, आवश्यक ठिकाणी नवीन स्पीड ब्रेकर उभारणे, रस्ता सुरक्षा सूचना फलक बदलणे आणि कॅट आय बसविण्याबाबत बैठकीत सूचना देण्यात आल्या. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ एचवरील काजळा फाटा तसेच इतर अपघातप्रवण ठिकाणी कॅट आय, स्पीड ब्रेकर आणि आवश्यक रस्ता सुरक्षा साधने बसविण्याच्या कामांचा आढावा घेण्यात आला.

अंबड चौफुली, देऊळगाव राजा रोड, बदनापूर रोड, मोतीबाग बायपास आणि इंदेवाडी ते मंठा मार्गावरील रस्ता सुरक्षा उपाययोजनांवरही चर्चा झाली. आवश्यक ठिकाणी रम्बल स्ट्रिप, काँक्रीट बॅरिअर, स्पीड ब्रेकर तसेच दिशादर्शक व सूचना फलक बसविण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या.

काही अपघातप्रवण ठिकाणी पथदिवे नसणे किंवा उपलब्ध प्रकाश व्यवस्था बंद असल्याने रात्रीच्या *(पान २ वर)*

# संपादकीय...

## डीजेचा आवाज थांबला; आता रोजगाराचा आवाज कोण ऐकणार?

गणेशोत्सव आला की शहराच्या रस्त्यांवर उत्साहाची लाट उसळते. ढोल-ताशे, लेझीम, तुतारी, भक्तिगीते आणि विविध वाद्यांच्या गजरात गणरायाचे स्वागत केले जाते. गेल्या काही वर्षांत या पारंपरिक वातावरणात डीजे आणि डॉल्बीने आपली जागा निर्माण केली. आवाज जितका मोठा, तितका उत्सव मोठा, अशी एक चुकीची मानसिकता तयार झाली आणि त्यातून ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला. त्यामुळे ध्वनीप्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी आणि नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण आवश्यक आहे, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. पण जालन्यात यंदा डीजेचा आवाज थांबला असताना एक वेगळा आवाज ऐकू येत आहेतो आहे रोजगाराचा! जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी डीजेमुक्त गणेशोत्सवाचे आवाहन केले. डीजे व्यावसायिकांनीही प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत नियमांचे पालन करण्याची भूमिका घेतली. ही बाब निश्चितच नोंद घेण्यासारखी आहे. कारण संघर्षाचा मार्ग न स्वीकारता प्रशासनाच्या आवाहनाला सहकार्य करण्याची भूमिका व्यावसायिकांनी घेतली आहे. डीजे आणि साउंड ॲण्ड लाईट व्यवसायात लाखो रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. एका सेटअपमागे चालक, तंत्रज्ञ, सहाय्यक, वाहतूक कर्मचारी अशा अनेकांचा रोजगार जोडलेला असल्याचे व्यावसायिक सांगतात. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, विवाह सोहळे आणि अन्य सार्वजनिक कार्यक्रम हा या व्यवसायाचा महत्त्वाचा उत्पन्नाचा काळ असतो. त्यामुळे उत्सवाच्या काळात पूर्णपणे व्यवसाय बंद राहिल्यास त्याचा आर्थिक परिणाम केवळ मालकावर होत नाही; त्या व्यवसायावर अवलंबून असलेल्या कामगारांच्या कुटुंबांपर्यंत त्याची झळ पोहोचते. म्हणूनच प्रश्न डीजे सुरू करायचा की बंद ठेवायचा एवढाच नाही. खरा प्रश्न आहेकायद्याच्या चौकटीत राहून काही नियंत्रित पर्याय शक्य आहेत का? इथे प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. न्यायालयीन निर्देश आणि ध्वनीप्रदूषणाचे नियम यांचा अर्थ अमर्याद आवाजाला मुभा असा निश्चितच नाही. नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करून कोणत्याही व्यवसायाला परवानगी देता येणार नाही. रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, ज्येष्ठ नागरिकांची वस्ती, शांतता क्षेत्रे आणि निवासी भाग यांचा विचार करणे अपरिहार्य आहे. पण त्याच वेळी ''नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई'' आणि ''नियम पाळण्यास तयार असलेल्या प्रत्येक व्यावसायिकावर पूर्ण बंदी'' यात फरक आहे.हा फरक प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेत दिसणे गरजेचे आहे. समजा, एखाद्या ठिकाणी ध्वनीची मर्यादा ओलांडली जाते, रात्रीच्या निर्धारित वेळेनंतर डीजे सुरू ठेवला जातो किंवा संवेदनशील क्षेत्रात नियमबाह्य ध्वनिव्यवस्था केली जातेतर कारवाई झालीच पाहिजे.

# सण नव्हे इव्हेंट

नुकताच झालेला दहीहंडीचा सण राज्यात मोठ्या उत्साहात साजरा झाला. मात्र उंचच उंच दहीहंडी फोडताना अनेक ठिकाणी दुर्घटना होऊन त्यात अनेक गोविंदा जखमी झाले. गुरुवार रात्री पर्यंत मुंबईतील जखमी झालेल्या गोविंदांची संख्या सव्वाशेच्या पुढे गेली. यातील काही गोविंदांना रुग्णालयात उपचार करून घरी सोडण्यात आले तर काही गोविंदा अजूनही रुग्णालयात उपचार घेत आहेत त्यातील काही गोविंदा जबर जखमी आहेत. अर्थात दहीहंडी फोडताना गोविंदा जबर जखमी होणे हे काही याच वर्षी घडले असे नाही दरवर्षी हेच चित्र पाहायला मिळते. पूर्वी या उंचच दहीहंडी फक्त पुणे, मुंबई, ठाणे या मोठ्या शहरातच पाहायला मिळत असे मात्र अलीकडे हे लोण ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण भागातही राजकीय नेते उंचच उंच दहीहंडी लावून हजारो रुपयांचे बक्षिसाचे आमिष दाखवून दहीहंडीचा इव्हेंट करुन राजकीय शक्तीप्रदर्शन करतात मात्र या शक्तीप्रदर्शनात अनेक गोविंदा जायबंदी होतात. राजकीय नेते गोविंदांचा विमा वगैरे शब्द वापरून तरुण गोविंदाना झुलवण्याचा प्रयत्न करतात पण अपघात झाल्यानंतर कायमस्वरूपी अपंगत्व आल्यावर मिळणारी विम्याची रक्कम म्हणजे आयुष्याचे सार नव्हे! ऐन तारुण्यात जर कायमस्वरूपी अपंगत्व आले तर त्या तरुण गोविंदाची आणि त्याच्या कुटुंबाची काय अवस्था होईल याची कल्पनाही करवत नाही. ऐन तारुण्यात वृद्ध आई वडिलांवर अवलंबून उर्वरित जीवन कंठण्याची वेळ त्यांच्यावर येते. अशा कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्या तरुण गोविंदांना राजकीय नेते वाऱ्यावर सोडतात कारण त्यांचे शक्तिप्रदर्शन संपलेले असते. अर्थात हे शक्तिप्रदर्शन केवळ दहीहंडी पुरतेच मर्यादित असते असे नाही तर तर सर्व सणांमध्ये असते. वास्तविक सण उत्सव हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. जगात सर्वाधिक सण भारतात साजरे केले जातात मुळातच भारत उत्सवप्रिय देश आहे मात्र अलीकडे हे सण उत्सवातील पावित्र्य नष्ट होत चालले आहे. ज्या उद्देशासाठी हे सण उत्सव साजरे केले जातात तो उद्देशच हरवला आहे.

आता हे सण उत्सव म्हणजे इव्हेंट बनले आहेत. कोणताही सण घ्या तो सण न राहता इव्हेंट बनला आहे मग तो दिवाळी असो की गणेशोत्सव. दिवाळीमध्येही फटाक्यांचे प्रदूषण आणि आगीच्या घटना घडतातच दिवाळी हा दिव्यांच्या सण आहे मात्र अलीकडे तो फटाक्यांच्या सण बनला आहे त्यामुळे ध्वनीप्रदूषणासोबतच वायू प्रदूषणही होते मात्र मोठ्या आवाजाचे प्रदूषण करणारे फटाके उडवून दिवाळी साजरी करण्याकडेच अनेकांचा कल असतो. मागील काही वर्षात गणेशोत्सवाचे पावित्र्यही लोप पावले आहे. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो उद्देशच आपण विसरलो आहोत. गणेशोत्सवातील उंचच उंच मूर्तींची स्पर्धा, नवसाला पावणाऱ्या गणेश मंडळातील स्पर्धा यामुळे गणेशोत्सव सण आहे की स्पर्धा असा प्रश्न पडतो. गणेशोत्सव म्हणजे राजकीय नेत्यांना पक्षांना आपले शक्तिप्रदर्शन करण्याचे हक्काचे व्यासपीठ वाटते. गणेश ही बुद्धीची देवता मानली जात असताना बुद्धी गुंडाळून त्याची खरी आराधना भक्ती करताच येत नाही. नवरात्रीमध्येही हीच परिस्थिती असते एकूणच आज सणांचे स्वरूप पूर्ण पालटले आहे. त्यातील पावित्र्य नष्ट झाले असून आता सण उत्सव म्हणजे केवळ इव्हेंट बनले आहे. सण उत्सव म्हणजे राजकीय नेत्यांसाठी शक्तीप्रदर्शन करण्याचे व्यासपीठ बनले आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्याच्या इतिहासातील शौर्यगाथा

आज १७ सप्टेंबर. हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले; मात्र देश स्वतंत्र झाल्यानंतरही मराठवाडा निजामाच्या राजवटीखाली पारतंत्र्यातच होता. त्यामुळे मराठवाड्यातील जनतेला स्वातंत्र्याचा अनुभव घेण्यासाठी आणखी एक संघर्ष करावा लागला. हा संघर्ष केवळ राजकीय नव्हता, तर तो स्वाभिमान, लोकशाही आणि भारतीय एकात्मतेसाठीचा लढा होता.

पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थानाचा भाग होता. या संस्थानावर निजाम मीर उस्मान अली खान याचे राज्य होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संस्थानांनी भारतात सामील व्हावे, अशी भूमिका भारत सरकारने घेतली होती. मात्र निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास नकार दिला. स्वतंत्र हैदराबादचे स्वप्न पाहणाऱ्या निजामाच्या भूमिकेमुळे संस्थानातील जनतेसमोर मोठे संकट निर्माण झाले. हैदराबाद संस्थानातील जनता मात्र भारताशी एकरूप होण्याच्या बाजूने होती. निजामाच्या राजवटीतून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद मुक्ती संग्रामाला वेग आला. मराठवाड्यातही या आंदोलनाची तीव्रता वाढत गेली. गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्यासह अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी या लढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

हैदराबाद संस्थानात त्यावेळी तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकातील काही प्रदेशांचा समावेश होता. निजामाच्या राजवटीविरुद्ध आवाज उठविणाऱ्या जनतेवर मोठ्या प्रमाणात दडपशाही करण्यात आली. निजामाचा समर्थक कासीम रिझवी आणि रझाकारांच्या कारवायांमुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तरीही स्वातंत्र्याची आस असलेली जनता मागे हटली नाही.

मराठवाड्यातील गावागावांतून स्वातंत्र्यसैनिक पुढे आले. अनेकांनी तुरुंगवास सहन केला, अनेकांनी लाठीमार आणि अत्याचार सोसले, तर अनेकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता भारतीय तिरंग्यासाठी संघर्ष केला. नांदेड, लातूर, परभणी, औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, जालना आणि हिंगोली या भागांतील जनतेनेही या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली. या लढ्यामुळे स्वातंत्र्याची भावना जनमानसात अधिक दृढ झाली.

निजामाच्या राजवटीकडून जनतेवरील अन्याय आणि अत्याचार सुरूच राहिल्याने भारत सरकारने अखेर कठोर निर्णय घेतला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो'अंतर्गत हैदराबाद संस्थानाविरुद्ध भारतीय सैन्याची कारवाई सुरू झाली. त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल भारताचे गृहमंत्री होते. संस्थानांचे भारतात विलीनीकरण करून देशाची अखंडता मजबूत करण्यामध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

भारतीय सैन्याने विविध दिशांनी हैदराबाद संस्थानात प्रवेश केला. सोलापूरच्या दिशेनेही भारतीय सैन्याने आगेकूच केली. काही दिवसांत भारतीय सैन्याने अनेक महत्त्वाची ठिकाणे ताब्यात घेतली. निजामाच्या सैन्याला भारतीय सैन्यापुढे फार काळ टिकाव धरता आला नाही. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यानंतर निजामाच्या सैन्याने शरणागती पत्करण्याचा निर्णय घेतला.

अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून मुक्त झाले. निजामाच्या सैन्याचे प्रमुख जनरल एल-एड्रूस यांनी भारतीय सैन्यासमोर शरणागती पत्करली. त्यानंतर हैदराबाद संस्थान भारताचा अविभाज्य भाग बनले आणि या प्रदेशात तिरंगा अभिमानाने फडकला. मराठवाड्यातील जनतेच्या दीर्घ संघर्षाला अखेर यश मिळाले.

मराठवाडा मुक्ती संग्राम हा भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. देशाला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले असले, तरी मराठवाड्यातील जनतेला निजामाच्या अन्यायी राजवटीतून मुक्त होण्यासाठी १९४८ पर्यंत संघर्ष करावा लागला. त्यामुळे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाड्याच्या स्वाभिमानाचा, त्यागाचा आणि संघर्षाचा दिवस आहे. आजच्या पिढीने या इतिहासाकडे केवळ सुट्टीचा किंवा औपचारिक कार्यक्रमाचा दिवस म्हणून पाहू नये. स्वातंत्र्य आपल्याला सहज मिळालेले नाही. असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी त्यासाठी त्याग केला आहे. त्यांच्या संघर्षामुळे आज आपण लोकशाही, स्वातंत्र्य आणि संविधानिक अधिकारांचा उपभोग घेत आहोत. त्यामुळे या इतिहासाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि पुढील पिढीला स्वातंत्र्याच्या मूल्यांची जाणीव करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाने आपल्याला एक महत्त्वाचा संदेश दिलाअन्याय कितीही मोठा असला तरी संघटित जनशक्ती, धैर्य आणि स्वातंत्र्याची प्रबळ इच्छा यांच्यापुढे तो टिकू शकत नाही. या संग्रामातून राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही आणि स्वाभिमानाचे महत्त्व अधोरेखित होते. मराठवाड्याच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या आणि आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना या दिनी विनम्र अभिवादन! त्यांच्या त्यागाची आणि शौर्याची गाथा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यसैनिकांना मानाचा मुजरा!

सर्व मराठवाडावासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

पान १ व ४ वरुन...

### जालना महापालिका...

**काँग्रेसला शहरात नवसंजीवनी देण्याचा निर्धार**

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांनी जालना शहर काँग्रेसच्या आगामी संघटनात्मक वाटचालीची दिशा स्पष्ट केली. शहर काँग्रेसला नवसंजीवनी देण्यासाठी संघटनेची नव्याने बांधणी करण्यात येणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. शहरातील प्रत्येक प्रभागात काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविण्यावर भर देण्यात येणार असून, केवळ पक्षाच्या बैठका आणि कार्यक्रमांपुरते संघटन मर्यादित न ठेवता सामान्य नागरिकांच्या प्रश्नांशी थेट जोडले जाणारे संघटन उभे करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे डॉ. धानुरे यांनी सांगितले. युवक, महिला, विद्यार्थी, कामगार तसेच विविध समाजघटकांपर्यंत काँग्रेसचा जनसंपर्क वाढविण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पक्षाच्या विचारधारेवर विश्वास असलेल्या कार्यकर्त्यांना सक्रिय करून प्रभागनिहाय संघटन मजबूत करण्यावर भर राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**'पदाधिकारी पदासाठी नव्हे, जनतेच्या प्रश्नांसाठी'**

''पदाधिकारी केवळ पदावर राहण्यासाठी नसून जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून काम करणारे असले पाहिजेत. जालना शहरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी काँग्रेसचे कार्यकर्ते सातत्याने संघर्ष करतील,'' असे डॉ. विशाल धानुरे यांनी स्पष्ट केले.

महापालिका स्तरावर नागरिकांना भेडसावणारे प्रश्न, मूलभूत सुविधांची स्थिती आणि विकासकामांबाबत काँग्रेस आगामी काळात आक्रमक भूमिका घेणार असल्याचे त्यांच्या भाषणातून स्पष्ट झाले.

**नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार**

कार्यक्रमात शहर काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नवीन पदाधिकाऱ्यांना संघटनात्मक जबाबदारीची जाणीव करून देतानाच प्रभागनिहाय जनसंपर्क वाढविण्याचे आवाहन करण्यात आले.

काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, प्रदेश उपाध्यक्ष अल्पसंख्याक काँग्रेस कमिटी बदर चाऊस, माजी आमदार राजेश राठोड, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, ज्येष्ठ नेते संजय मुथा, सुनील चौधरी, राजेंद्र गोरे, अशोक उबाळे, ज्ञानेश्वर भादरंगे, चैतन्य जायभाये, नंदा मित्तल, करिम बिल्डर, सागर चौधरी, योगेश कदम, विनोद पांडव, रघुवीर गुडे, इब्राहिम शेख, वसीम शेख, चंद्रकांत रत्नपारखे, वसीम खान, बाबासाहेब सोनवणे, दिनेश सुराणा, आरेफ शेख, देविराज डोंगरे आदी उपस्थित होते.

याशिवाय शहर काँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, एनएसयूआय, सेवादल तसेच विविध सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शहराच्या प्रश्नांवर काँग्रेसची भूमिका आक्रमक होणार**

महापालिकेतील अंतर्गत राजकारणावरून खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केलेली टीका आणि महापालिका बरखास्त करण्याची जाहीर केलेली मागणी यामुळे जालना शहरातील स्थानिक राजकारणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. दुसरीकडे शहर काँग्रेसने संघटनात्मक पुनर्बांधणीची घोषणा केल्याने आगामी काळात महापालिकेतील नागरिकांच्या प्रश्नांवर काँग्रेस अधिक सक्रिय भूमिका घेण्याची चिन्हे आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रघुवीर गुडे यांनी केले, तर आभार आदित्य चंदनकर यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांच्या वतीने करण्यात आले.

### अपघातप्रवण स्थळांवरील...

वेळी दृश्यमानता कमी होत असल्याचे बैठकीत निदर्शनास आले. विशेषतः इंद्रायणी हॉटेल, चंदनझीरा परिसरातील प्रकाश व्यवस्था आणि वीजपुरवठ्याच्या अडचणींवर चर्चा करण्यात आली. तर काही ठिकाणी विद्युत विभागाच्या डीपी आणि वीजपुरवठ्याशी संबंधित अडचणी असल्याने संबंधित यंत्रणांनी विद्युत विभागाशी समन्वय साधून स्वतंत्र डीपी उपलब्ध करून घेण्यासाठी कार्यवाही करावी, तसेच प्रलंबित प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच काही ब्लॅक स्पॉटवरील कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, वीज वितरण कंपनी आणि इतर संबंधित यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. त्यामुळे सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून रस्ता सुरक्षा उपाययोजनांची कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले. मागील बैठकीत निर्देश देऊनही काही कामे अद्याप प्रलंबित असल्याचे आढळून आले. ही कामे तातडीने पूर्ण करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अंबड चौफुलीच्या सौंदर्यीकरणाच्या प्रस्तावावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. चौफुली परिसरातील वाहतूक आणि रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांचा विचार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्व अपघातप्रवण स्थळांवरील सुरक्षा उपाययोजना वेळेत पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. खराब सुरक्षा साधने बदलणे, प्रकाश व्यवस्था सुधारणे, योग्य ठिकाणी स्पीड ब्रेकर व रम्बल स्ट्रिप बसविणे, सूचना फलक आणि कॅट आय बसविणे तसेच विहिरींच्या ठिकाणी सुरक्षा उपाय करणे याबाबत संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

### मराठवाडा मुक्तीसंग्रामात...

रोजी रझाकारांविरुद्ध सशस्त्र लढा दिला. जिल्ह्यातील विविध ठिकाणी जंगल सत्याग्रह ही झाले. नागरिकांना शासनाच्या विविध सेवा, योजना, अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती घरपोच उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सुरू केलेल्या 'जालना मित्र' पोर्टलच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात २ हजार ४६२ नागरिकांना घरपोच प्रमाणपत्रे वितरित करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली. प्रारंभी मान्यवरांनी टाऊन हॉल परिसरात लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यानंतर हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. तर पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोकधून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली.

यावेळी स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, विद्यार्थी, नागरिक यांची उपस्थिती होती.

### सुयश कॉलेज...

प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्प्याचा गौरव करणारा हा दीक्षांत समारंभ *''यशाचा उत्सव आणि उज्ज्वल भविष्याकडे एक पाऊल''** ठरणार आहे. संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, व्यावसायिक प्रगती आणि फार्मसी क्षेत्रात उज्ज्वल कारकीर्दीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. शेवटी आभार प्रदर्शन डॉक्टर स्वप्नील भराड यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

### जिल्हा परिषदेत...

उपक्रम राबविला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातुन १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जालना जिल्ह्यात जिल्हा व प्रत्येक तालुकास्तरावर सेवा सेतू शिबिरे आयोजित करण्यात येणार आहे. याद्वारे नागरिकांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देणे, कार्यालयांमधील प्रलंबित कामांचा गतीने निपटारा करणे, नाविन्यपूर्ण संकल्पना मांडण्यासाठी इनोव्हेशन चॅलेंज, सेवा माझे योगदान, स्वच्छता मोहीम आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

यावेळी कार्यक्रमास कार्यकारी अभियंता जंजाळ, शिक्षणाधिकारी संगीता भागवत, उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे, गटविकास अधिकारी ऋषिकेश टेकाळे, सहायक गटविकास अधिकारी गजानन पाखरे, संपर्क अधिकारी भगवान तायड यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

### माणसांनी माणसांच्या...

संस्था उपाध्यक्ष शेख जमीर, आदर्श शिक्षक सखाराम बोरकर, सुरेश बोर्डे, दिनकर ससाने, युसुफ सौदागर, शेख सादिक, बी. डी. सवडे, प्रदीप मुळे, राजेश चव्हाण, ज्ञानेश्वर उखर्डे, भिकाजी खांडेभराड, मुख्तारखा पठाण, सय्यद बाबा, नसीम शेख आदींची उपस्थिती होती.

### मराठवाडा मुक्तिसंग्राम...

मोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कु. गायत्री संदीप कोल्हे हिचा ₹३,१००, द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या कु. सृष्टी संतोष कोल्हे हिचा ₹२,१००, तर तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या कु. स्वाती परमेश्वर वाघमारे हिचा ₹१,१०० रोख पारितोषिक, सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. स्वातंत्र्यसैनिक स्व. उत्तमराव गणपतराव पाटील कोल्हे यांनी हैदराबाद संस्थानातील नागरी अवज्ञा आंदोलनात सक्रिय सहभाग, निजामाच्या आदेशांना अहिंसक पद्धतीने विरोध करणे, सत्याग्रह करणे, जनजागृती करणे, राष्ट्रध्वज फडकाविणे आणि लोकशाही अधिकाराची मागणी करणे अशा विविध मार्गाने निजामशाही विरुद्ध आवाज उठविला होता. निजाम सरकारने त्यांना अटक करून कारावासात ठेवले होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी सुमारे दीड वर्ष कारावास भोगला. त्यांच्या त्याग, धैर्य आणि देशप्रेमाची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड, गुणवत्तेची जिद्द आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यावेळी बोलताना प्रा. राजेंद्र भोसले यांनी ''स्वातंत्र्याची यशोगाथा मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन'' या विषयावर विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. त्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान, त्याग आणि संघर्ष यांची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडली. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून नव्या पिढीने प्रेरणा घेऊन देशसेवेची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रल्हाद काका कोल्हे, सतीश कोल्हे, सत्तू आण्णा कोल्हे, सवाराम कोल्हे, नारायण कोल्हे, कृष्णा कोल्हे, प्रल्हाद कोल्हे, विष्णुपंत कोल्हे, अविनाश कोल्हे, विलास कोल्हे, परमेश्वर कोल्हे, सुनील कोल्हे, बाळासाहेब कोल्हे, कैलास कोल्हे, अनिल कोल्हे, विनोद खंडागळे, दत्ता पाटील कोल्हे, गणेश कोल्हे, इंद्रराव कोल्हे, सचिन कोल्हे आदींसह ग्रामस्थ, पालक, शिक्षक, विद्यार्थी व इतिहासप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### समाजाभिमुख...

आणि सहकार्य आहे. त्यामुळे हा सन्मान मी त्यांच्या वतीने स्वीकारत आहे.'' अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई, जिल्हा शाखा लातूरच्या वतीने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांना 'लातूर भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दयानंद सभागृहात झालेल्या कार्यक्रमात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखतानाच पोलीस दल अधिक समाजाभिमुख, संवादकेंद्रित आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेणारे बनविण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली. तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली १ ऑगस्टपासून 'पोलीस विद्यार्थी संवाद' उपक्रम सुरू करण्यात आला. शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसमध्ये पोलीस अधिकारी-अंमलदारांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, सायबर गुन्हे, नवीन कायदे, वाहतूक नियम, डायल ११२, दामिनी पथक आणि सुरक्षिततेच्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागात 'पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर', तर शहरी भागात 'पोलीस आपल्या सोसायटीमध्ये' या उपक्रमातून नागरिकांशी थेट संपर्क साधण्यात आला.

दैनिक युवा आदर्श दि. १८-०९-२०२६
CHANGE IN NAME
I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
DOEJADKAR ARUN BABANRAO
To New Name
ARUN BABANRAO DOIJADKAR
For Passport Issuence
Add - Mondha Gajanan Colony, Ashti, Dist. Jalna.431507.

दैनिक युवा आदर्श दि. १८-०९-२०२६
CHANGE IN NAME
I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
DEEBA SYED
To New Name
SYEDA DEEBA SYED KHALED
For Passport Issuence
Add - ROW HOUSE NO A-7 AQSA PARK, BHAVANI NAGAR, OLD JALNA.
JALNA.431203

# भारतीय तत्त्वज्ञान समाजात कीर्तनकारांनी पोहचवले - डॉ शाम महाराज नेरकर

**दत्ता देशमुख**

भारताला समृद्ध ज्ञान परंपरा लाभली आहे. वेद उपनिषदे आदी ग्रंथांमधून मानवी जीवनातील सर्वोच्च तत्त्वज्ञान गुरु शिष्य परंपरेने पुढे आले व ग्रंथीत झाले. तेच तत्त्वज्ञान महाराष्ट्रामध्ये साधुसंतांनी आपल्या मराठी भाषेमध्ये मांडले व किर्तन प्रवचनाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवले. तीच किर्तन परंपरा महाराष्ट्रामध्ये सुरू असून कीर्तनकारांनी हे तत्त्वज्ञान खेड्यापाड्यांमध्ये अगदी तळागाळापर्यंत नेऊन पोहोचवले आहे . कीर्तनालाही अनुबंध असतो याचे सुंदर विवेचन त्यांनी केले. नारदा पासून सुरू झालेली कीर्तन परंपरा पुढे नामदेव महाराजांनी अगदी आचारसंहितेसह सादर केले. कीर्तनाची आचारसंहिता संत ज्ञानेश्वर महाराजांनी मांडली असून त्याचे प्रात्यक्षिक संत नामदेव महाराजांनी करून दाखविले व समाजाने अशा पद्धतीने कीर्तनाची परंपरा पुढे चालवावी हे दाखवून दिले असे प्रतिपादन डॉ शाम महाराज नेरकर यांनी संत परिषदेत बीजभाषणात केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व श्रीपती इंद्राबाई पाठक महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संत परिषद महाविद्यालय संपन्न झाली. या संत परिषदेचे उद्घाटन राष्ट्रीय धर्माचार्य ह



भ प डॉ जनार्दन महाराज मेटे यांनी केले. ते बोलताना म्हणाले की ज्ञानाची परंपरा ही शिव पार्वती पासून सुरुवात झाली पुढे गुरु शिष्याच्या माध्यमातून ती पुढे चालत राहिली विष्णू व शिव यांचीही ज्ञानाची परंपरा सुरू आहे. कीर्तनकारानी सखोल अभ्यास करून हे तत्त्वज्ञान समाजापर्यंत. स्वतः कीर्तनकारांनी समाजापर्यंत जाऊन हे तत्त्वज्ञान दिले. वारकरी साधुसंतांनी गावोगावी जाऊन हे तत्त्वज्ञान समाजाला दिल्याचे अनेक दाखले त्यांनी दिले. अशा संत परिषदेचे आयोजन केल्याबद्दल विद्यापीठाचे ही त्यांनी अभिनंदन केले व अशा संत परिषदांची आवश्यकता असल्याचे नमूद केले. भागवताचार्य श्रीमती मनीषाताई बिडाईत महाराज यांनी संत मुक्ताबाई जनाबाई ते संत बहिणाबाई यांच्यापर्यंत महिला संत व त्यांच्या कार्याचे अनेक दाखले देत महिला कीर्तनकार यांचेही कार्य महत्त्वाचे असल्याचे विशद केले. वारकरी संप्रदायामध्ये स्त्री-पुरुष हा भेद पाहिला जात नाही. भारतीय तत्त्वज्ञानाने व महाराष्ट्रातील साधुसंतांनी समाजाला ब्रह्मदृष्टी दिल्याने भेदभाव मावळून जातो. संत ज्ञानेश्वर महाराज ताटी लावून बसले असता त्यांची धाकटी बहीण मुक्ताबाई यांनी अभंगाद्वारे त्यांना उपदेश करून ताटी उघडण्यासाठी भाग पाडले एवढा मुक्ताबाईचा अधिकार असून त्यांची जी परंपरा महिला कीर्तनकार चालवीत आहेत त्याचे स्वागत केले पाहिजे असे त्या म्हणाल्या. वेदांत तत्त्वज्ञानाचे अभ्यासक हभप डॉ प्रमोद महाराज कुमावत म्हणाले वारकरी संप्रदायामध्ये भेदाला महत्व नसून अभेद सांगणारा हा संप्रदाय आहे. जीवनामध्ये तत्वज्ञानाचे महत्त्व सांगताना त्यांनी शंकराचार्य व ज्ञानेश्वर महाराज या दोन महात्म्यांचे भारतीयांवर उपकार असल्याचे नमूद केले. महाराष्ट्रामध्ये संत ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव सारखा अमूल्य ज्ञान ठेवा आपल्याला दिला असून त्या ग्रंथापर्यंत पोहोचण्याची दृष्टी समाजाला प्राप्त झाली पाहिजे त्यासाठी अविरतपणे अध्ययन केले पाहिजे याचे महत्त्व विशद केले. कीर्तनापेक्षा प्रवचने श्रेष्ठ व त्यापेक्षाही पाठ श्रेष्ठ असून पाठाची परंपरा ही ज्ञानाची गंगा असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्ष समारोपामध्ये आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ अश्विन रांजणीकर यांनी आजीवन अध्यापन करण्याचे काम खऱ्या अर्थाने कीर्तनकार मंडळी करीत असल्याचे नमूद केले. चार जिल्ह्यांमध्ये संत परिषदांचे आयोजन केले असून या चार संत संमेलनांमधून सर्व संतांचे एकत्रीकरण करून एक मोठे संत परिषदेचे आयोजन विद्यापीठामार्फत करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. समाजातील विविध घटकांना या शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ अन्विता अग्रवाल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ मीनाक्षी देव यांनी केले. सूत्रसंचलन अधिव्याख्याता योगेश्वर जाधव यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथ पूजन व दीपप्रज्वलनाने केली.

प्रारंभी गायणाचार्य हभप अशोक महाराज सुरडकर, हभप डॉ आदिनाथ महाराज कदम, मृदंगाचार्य हभप ओमप्रकाश महाराज कांगणे, संवादिनी वादक हभप विष्णू महाराज राजगुडे यांच्या भजनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

यावेळी हभप डॉ बालाजी महाराज जाधव,हभप एकनाथ महाराज जाधव,हभप एकनाथ महाराज वाघ, हभप सायंकर महाराज,हभप नवनाथ महाराज जाधव, दिवाकर कुलकर्णी, सुधाकर तरटे, संत साहित्याचे अभ्यासक डॉ दत्तात्रेय डुंबरे, डॉ वैशाली जहागीरदार, राजाराम टकले, विजयकुमार शिंदे शहरातून आलेली भाविक मंडळी संत साहित्याची अभ्यासक मंडळी उपस्थित होते.

# बेकायदेशीर गणेश मंडप आणि विजेची चोरी म्हणजे साक्षात बाप्पाचाच अवमान: ॲड. अश्विनी महेश धन्नावात

**जालना - प्रतिनिधी**

उत्सवादरम्यान वाहतूक कोंडी रोखण्यासाठी स्वयंसेवक नेमावेत; महिलांचा सहभाग वाढवून त्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आणि महिलांच्या तक्रारींसाठी स्थानिक तक्रार समितीकडे दाद मागण्याचे आवाहन

जालनाः गणेशोत्सव हा अत्यंत पवित्र, मांगल्याचा आणि आनंदाचा सण आहे. परंतु, या उत्सवाच्या नावाखाली जर कोणी बेकायदेशीर गणेश मंडप घालत असेल, अनधिकृतपणे विजेची चोरी करत असेल किंवा मंडप परिसरात कोणतेही गुन्हेगारी कृत्य करत असेल, तर ते थेट भगवान श्री गणेशाचा अवमान करण्यासारखेच आहे, असे स्पष्ट प्रतिपादन प्रसिद्ध विधीतज्ज्ञ ॲड. अश्विनी महेश धन्नावात यांनी आपल्या निवेदनात केले आहे. ॲड. धन्नावात यांनी पुढे बोलताना सांगितले की, भगवान श्री गणेश हे स्वतः नियम, कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षक व पालनकर्ते आहेत. बाप्पा नेहमी सर्वांना सन्मार्गाने आणि कायद्याच्या चौकटीत राहून चालण्याची सद्बुद्धी देतात. असे असताना, त्यांच्याच उत्सवात कायद्याचे उल्लंघन करणे आणि बेकायदेशीर कृत्ये करणे अत्यंत चुकीचे असून, यामुळे सणाच्या मूळ हेतूलाच काळिमा फासली जातो.

याप्रसंगी बोलताना ॲड. अश्विनी महेश धन्नावात यांनी जालन्यातील सद्यस्थितीवर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, जालनेकर नागरिक आज खरोखरच अत्यंत भाग्यवान आहेत; कारण जिल्ह्याला अत्यंत सक्षम, खंबीर आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचे नेतृत्व लाभले आहे. जालना जिल्हाधिकारी अश्मिता मित्तल यांच्या दूरदर्शी आणि लोकभिमुख कार्यपद्धतीमुळे जिल्हा प्रगतीपथावर आहे. तसेच शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा अतिशय कौतुकास्पद आणि गतिमान काम करत आहेत. दुसरीकडे, संपूर्ण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू यांचे कडक व तत्पर प्रशासन कार्यरत आहे. अशा सक्षम त्रिकुटाच्या हाती जालन्याची धुरा असल्याने नागरिकांमध्ये सुरक्षिततेचे आणि समाधानाचे वातावरण आहे.



मुंबई येथे काल दिनांक १६ सप्टेंबर २०२६ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नंदनवन या शासकीय निवासस्थानी घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमत उढाण यांनी गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी त्यांच्यासोबत अजित उढाण यांची उपस्थिती होती.गणरायाच्या चरणी घनसावंगी मतदारसंघातील जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली.

# राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत कै. बाबुराव जाफ्राबादकर विद्यालयाचे यश!

## *संध्या पांगारकर व नंदिनी शहाणे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार!*

**दत्ता देशमुख**

सायन्स हॉबी सेंटर, जालना यांच्या वतीने संजय टिकरिया यांनी आयोजित केली होती.राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत हिंदू समाज संस्था संचलित कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. विज्ञान शिक्षण आणि मी' हा स्पर्धेचा विषय होता. संपूर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यामध्ये मुंबई, पुणे सोलापूर,हिंगोली, नांदेड, जिंतूर, बीड अशा विविध जिल्ह्याचा समावेश होता. या स्पर्धेत कै.बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयातील संध्या पांगारकर व नंदिनी शहाणे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला. विद्यार्थिनींनी स्वतःच्या



विचारशक्तीचा व कल्पकतेचा प्रभावी वापर करून, सुंदर हस्ताक्षरात व आशयपूर्ण पद्धतीने निबंध सादर केला. त्यांच्या उत्कृष्ट लेखनाची दखल घेत त्यांना कलाईडस्कोप,प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.सायन्स हॉबी सेंटरच्या वतीने विद्यार्थिनींना संजय टीकारीया यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच विद्यालयात सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती.मीनाक्षी कुलकर्णी व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक उपक्रमशील शिक्षक संदीप इंगोले यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून भविष्यातील यशासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल हिंदू समाज संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजीव देशपांडे, उपाध्यक्ष जगदीश बडवे, भगवान धोत्रे, सचिव चंद्रशेखर वाघमारे, संचालक डॉ. विनायक दसरे, कुमारजी देशपांडे, नितीन कोळेश्वर, जुगलकिशोर भक्कड, रावसाहेब अवघड व अरुण किनगावकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक व साहित्यिक उपक्रमांना निश्चितच नवी प्रेरणा मिळाली आहे.

# जिल्हा व सत्र न्यायालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जिल्हा व सत्र न्यायालय जालना येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती मृदूला भाटिया यांच्या हस्ते ध्वजारोहण साजरे करण्यात आले तद्पूर्वी जालना तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयात वरिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.पी. दिवाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एन.एस. शेख, श्रीमती बी.एस. गारे, आर. बी. पारवेकर, वर्षा निहलानी, जी. आर. ढेपे, सदस्य सचिव नितेश बंडगर, मुख्य न्याय दंडाधिकारी एस. एम. पाडोळीकर, न्यायाधीश ए. आर. नागोरी, न्यायाधीश एच. वाय. कावले, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड विनायकराव चिटणीस, ॲड स्वप्नील खराबे, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड बाबासाहेब इंगळे, सहायक जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड जयश्री बोराडे, ॲड भारत खांडेकर, ॲड अशोक मते, ॲड दिपक कोल्हे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड परमेश्वर गडगीळे, उपाध्यक्ष ॲड अशोक वाहूळकर, सचिव विनोद कुलकर्णी, सह सचिव ॲड शिवनाथ जऱ्हाड, ॲड अरविंद मुरमे आदिंसह जिल्हा वकील संघाचे सदस्य यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच यावेळी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने घेतलेल्या रक्तदान शिबीरातील १०२ रक्तदात्यांपैकी प्रातिनिधीक स्वरुपात प्रमाणपत्रांचे वाटप व आयोजित क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

# सिध्दार्थ महाविद्यालयात राष्ट्रभाषा हिंदी दिवस उत्साहात साजरा

**दत्ता देशमुख**

येथिल सिध्यर्थं कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने राष्ट्रभाषा हिंदी दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन साजरा करण्यात आला. राष्ट्रभाषा हिंदी दिनांचे औचित्य साधून विभागाच्या वतीने छत्रपती संभाजी नगर येथील छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या प्रा. डॉ.शामल धावारे या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.या कार्याक्रमा प्रसंगी त्या म्हणाल्या.. हिंदी भाषा ही जीवनाची खरीखुरी महत्वाची भाषा आहे.हिंदी भाषेचा उपयोग जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण सर्व भारतीयांनी प्रयत्न केले पाहिजेत.येणाऱ्या काळात



हिंदी भाषेची गरज मोठ्या प्रमाणात असणार आहे.कारण हिंदी भाषा हि जशी बोलली जाते तशीच लिहली जाते.हिंदी हि मातृभाषा आहे.जिने घटक राज्य व केंद्रशासित प्रदेशात एका छत्राखाली आणून भारतीयांना एकत्रित ठेवलं आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ.सुनील मेढे हे होते.आपल्या अध्यक्षिय भाषणात त्यांनी हिंदी भाषा ही सर्वश्रेष्ठ राजा भाषा आहे असे प्रतिपादन केले. राष्ट्रभाषा हिंदी मुळेच भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात इंग्रजी भाषेनंतर विचारांची देवाणघेवाण होत आहे. राष्ट्रभाषा हिंदी मुळेच भारताची ओळख संपूर्ण जगाला होत आहे असे ही आपल्या भाषणांतून व्यक्त केले.या कार्यक्रमाप्रसंगी विभागाचे प्रा. डॉ.सुदाम पाटील यांनी प्रास्ताविक केले. हिंदी विभागाचे प्रमुख प्रा.अनिल वैद्य, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा विनोद हिवराळे,प्रा.वाघमारे एस पी हे उपस्थित होते.विभागाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.त्यात काव्य वाचन स्पर्धा, निबंध स्पर्धा, भित्तीपत्रके,प्रश्न मंजुषा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा,अशा विविध स्पर्धांचे आयोजन करुन हिंदी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव देवरे या विद्यार्थ्यांने केले तर आभार प्रदर्शन प्रा.वाघमारे एस पी यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.




घनसावंगी येथे काल दिनांक १७ सप्टेंबर २०२६ गुरुवार रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कै.दत्तासाहेब देशमुख विद्यालयात घनसावंगी नगरपंचायतीचे जेष्ठ नगरसेवक शेख जमील सौदागर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या प्रसंगी प्रभाकर घाईत,उपनगराध्यक्ष शेख मुमताज,शेख नजीम मुख्याध्यापक केशव अटकर सह इतरांची उपस्थिती होती.




# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा






**मंठा - प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व पीएमश्री प्रशाला,पाटोदा येथे ७९ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त गावातून प्रभात फेरी काढून मानवी रांगोळी साकारण्यात आली. ध्वजारोहण केल्यानंतर शाळेत विविध उपक्रम घेण्यात आले.कार्यक्रमात सौरभ नजान, विठ्ठल डोळझाके, वेदिका अंबूरे, सोहम काळे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले तसेच श्रेया नजान हिने सूत्रसंचालन केले. कार्तिकी सोनसळे, साक्षी घोंगडे, अनुष्का घोंगडे व संस्कृती बनसोडे या विद्यार्थिनींनी प्रथमच मंचावर स्वागतगीत सादर केले. यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामातील क्रांतिकारकांचे योगदान व संग्रामाची यशोगाथा विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. ध्वजारोहणानंतर शाळा परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच पर्यावरण संवर्धन, प्रदूषणाचे प्रकार, कचरा वर्गीकरण आणि प्लास्टिकमुक्ती याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. श्रेया स्पर्धा परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल व जिजाऊ ज्युनिअर कॉलेज, टेंभुर्णी येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा

**दत्ता देशमुख**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य पंजाब लहाने यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण पार पडले. राष्ट्रगीत व ध्वजगीताच्या सुरांनी संपूर्ण शाळा परिसर देशभक्तीमय झाला होता. या प्रसंगी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास, रझाकारांविरुद्ध दिलेला लढा आणि हुतात्म्यांचे बलिदान यांवर ओघवत्या शैलीत भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक संजय फलटणकर म्हणाले, "१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला असला, तरी मराठवाड्याला स्वातंत्र्यासाठी प्रदीर्घ लढा द्यावा लागला. स्वामी रामानंद तीर्थ, हुतात्मा गोविंदभाई श्रॉफ यांच्यासह अनेक शूरवीरांच्या बलिदानामुळे आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या खंबीर नेतृत्वामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा स्वतंत्र झाला. आजच्या युवा पिढीने या इतिहासाची जाणीव ठेवून देशसेवेसाठी सदैव तत्पर राहिले पाहिजे. जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक योगेश सवडे यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे महत्त्व व इतिहास पटवून दिला. कार्यक्रमास शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मंजरी पिंपळे व प्रेरणा सपाटे यांनी केले कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# उत्सव भक्तीचा..बंदोबस्त खाकीचा!

## दानापूरात संतोष माने यांच्या नेतृत्वाखाली रूट मार्च..

**भोकरदन - प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी भोकरदन पोलीस ठाण्याच्या वतीने दानापूर येथे पोलिसांनी जोरदार रूट मार्च काढला.पोलीस निरीक्षक संतोष माने यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या पथसंचलनातून शांतता भंग करणाऱ्यांना पोलिसांचा स्पष्ट संदेश देण्यात आला.दानापूर येथील मुख्य रस्ते,प्रमुख चौक तसेच संवेदनशील भागांतून पोलिसांचा फौजफाटा संचलित झाला.



गणेशोत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली आहे. पथसंचलनानंतर ग्रामस्थांशी संवाद साधताना पोलीस निरीक्षक संतोष माने यांनी शांतता,सामाजिक सलोखा आणि बंधुभाव कायम ठेवून गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले.

सोशल मीडियावरून पसरणाऱ्या अफवा अथवा आक्षेपार्ह संदेशांवर विश्वास ठेवू नये. कोणत्याही परिस्थितीत कायदा हातात घेऊ नये,असे त्यांनी स्पष्ट केले.उत्सवाच्या काळात नियमांचे उल्लंघन करून शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलीस निरीक्षक माने यांनी दिला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल बांगर यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# माणसांनी माणसांच्या भल्यासाठी झटावे : जाती धर्माच्या नावावर आपसात भांडू नका : आर्किटेक्ट अर्शद शेख

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी - मानव म्हणून आम्ही सर्व एकच आहोत. यासाठी मानवता धर्माचे पालन करत माणसाने माणसाच्या भल्यासाठी सदैव झटत राहावे असे आवाहन पीस फाउंडेशन चे राष्ट्रीय अध्यक्ष आर्किटेक अर्शद शेख यांनी केले. शनिवारी टेंभुर्णी दौऱ्यावर आले असता ते येथील महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयात आयोजित एका कार्यक्रमात गावातील सर्वधर्मीय समाज बांधवांसोबत संवाद साधत होते. यावेळी मंचावर पीस फाउंडेशनचे मराठवाडा समन्वयक मिर्झा अफसर बेग, बुलढाणा जिल्हाध्यक्ष आलम कोटकर, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष पी.जी. तांबेकर, माजी सुभेदार प्रभू वाघमारे,



सामाजिक कार्यकर्ते रघुराम उखर्डे, संस्था अध्यक्ष हबीब ऐद्रुस चाऊस, मौलाना शमशुद्दीन, हाफिज हारून खान, वाचनालयाचे प्रमुख रावसाहेब अंभोरे आदींची विशेष उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना अर्शद शेख म्हणाले की आज जाती आणि धर्माच्या नावावर माणसामाणसात द्वेष निर्माण केला जात आहे. यासाठी आम्हाला आज द्वेषाचा नव्हे तर प्रेमाचा संदेश प्रत्येकाला द्यायचा आहे. आमच्या सुखदुः खात आम्हालाच धावून जावे लागते त्यावेळी आम्ही कोणीही आमच्या जाती आणि धर्माचा विचार करत नाही. ईश्वराने आम्हाला एकमेकांच्या सोबत चांगले वागण्यासाठी पाठविले आहे. आज देशासमोर शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी आधी अनेक ज्वलंत प्रश्न असताना केवळ जाती धर्माच्या भिंती उभ्या करून आम्हाला जाणीवपूर्वक त्यामध्ये गुंतवून ठेवले जात आहे. यासाठी आम्ही केवळ माणूस म्हणून एकमेकांसाठी उभे राहिले पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी पीस फाउंडेशन तर्फे सध्या संपूर्ण देशभर राबविल्या जात असलेल्या आयडिया ऑफ इंडिया या कार्यक्रमाबद्दल त्यांनी सविस्तर माहिती सांगितली. आपण सर्वांनी या कार्यक्रमाचे घटक बनावे असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी अर्शद शेख लिखित इस्लाम द अल्टिमेटम ऑफ आर्ट ऑफ लिव्हिंग हे पुस्तक वाचनालयासह उपस्थितांना भेट देण्यात आले. यावेळी शिक्षक दिनकर ससाने यांनी आपल्या भाषणात समाजाच्या भल्यासाठी सर्व धर्मीय समाज बांधवांनी एकत्रित येणे काळाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिर्झा अफसर बेग यांनी केले तर सुत्रसंचलन शेख साबेर यांनी केले. कार्यक्रमाला नवभारत शिक्षण (पान २ वर)

# कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन ही काळाची गरज मुरलीधर भोयर

**दत्ता देशमुख**

हिंदू समाज संस्था संचलित कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयात 'कचऱ्याचे व्यवस्थापन' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक मुरलीधर भोयर यांनी विद्यार्थ्यांना कचऱ्याचे प्रकार, त्याचे वर्गीकरण तसेच कचऱ्यामुळे होणारे पर्यावरणीय दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी भोयर यांनी मानवनिर्मित व निसर्गनिर्मित कचरा याबाबत माहिती देताना प्लास्टिकच्या अतिवापरामुळे पर्यावरणावर होणाऱ्या गंभीर परिणामांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष



वेधले. घरातून बाहेर पडणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या व इतर प्लास्टिक वस्तू नाल्या, सांडपाणी वाहिन्या व नद्यांमार्फत अखेरीस समुद्रापर्यंत पोहोचतात. त्यामुळे जलप्रदूषणासह पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कचऱ्याचे ओला, सुका, सॅनिटरी आणि घातक कचरा असे वर्गीकरण करून त्यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत व बायोगॅस तयार करता येतो, तर प्लास्टिक, बॅग, बूट आदी सुक्या कचऱ्याचे पुनर्वापर व पुनर्चक्रण करता येते. 'टाकाऊपासून टिकाऊ' वस्तू तयार करण्याची संकल्पना विद्यार्थ्यांनी अंगीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच सॅनिटरी कचरा आणि घातक कचरा इतर कचऱ्यापासून वेगळा ठेवण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले. प्लास्टिकचा वापर कमी करून त्याऐवजी स्टीलच्या डब्यांचा वापर करण्याचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

मार्गदर्शक भोयर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत कचरा व्यवस्थापनासंदर्भात विविध प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्नांची उत्तरे देत सहभाग नोंदविला. योग्य उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी भेटवस्तू देऊन प्रोत्साहन दिले. ओला कचरा, सुका कचरा, ई-कचरा आदींचे वर्गीकरण याबाबत विद्यार्थ्यांनी योग्य उत्तरे दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी समाजामध्ये कचऱ्यामुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती मीनाक्षी कुलकर्णी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संदीप इंगोले यांनी केले.

# गणेशोत्सवात दर्शनासोबत आरोग्याचीही काळजी; १००४ मंडळांत आरोग्य तपासणी शिबिरे

## लाभ घेण्याचे श्री गणेश महासंघाचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या उत्साहात भाविकांना दर्शनासोबतच आरोग्य तपासणीची सुविधा मिळणार आहे. जिल्ह्यातील १००४ सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री गणेश महासंघाने केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या समन्वयातून ही शिबिरे घेतली जात आहेत.

मंडपात येणाऱ्या भाविकांची व परिसरातील नागरिकांची रक्तदाब, मधुमेह व इतर प्राथमिक तपासणी याच ठिकाणी केली जाणार आहे. शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व खासगी क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांचे सहकार्य यासाठी लाभणार आहे. तपासणी दरम्यान गंभीर आजाराचे निदान झाल्यास आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना शासकीय योजनांमधून पुढील उपचार मिळवून देण्याची व्यवस्था मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे जिल्हा समन्वयक डॉ. सोपान चव्हाण यांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकाराच्या सुरुवातीच्या लक्षणांकडे अनेकदा दुर्लक्ष होते. त्यामुळे दर्शनासाठी येतानाच आरोग्य तपासणी करून घेणे हिताचे ठरेल. सर्व गणेश मंडळांनी व भाविकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक जगदीश अग्रवाल, कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत, उपाध्यक्ष आनंद बंब, गौरव बोरा, डॉ. शिवदत्त विजयसेनानी, महासचिव भूषण यादव सदस्य अर्जुन पित्ती, शिरीष अग्रवाल, अमोल बांगड यांनी केले आहे.



जालना शहरातील ओळखल्या जाणाऱ्या मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे श्रींची सकाळ ची महाआरती दिलीप अग्रवाल, उद्योजक सहपत्नी चंद्रकला अग्रवाल, इंजिनीयर रोहित अग्रवाल माजी शहराध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस तथा विशेष कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र शासन, इंजिनिअर मोहित अग्रवाल, यांच्या शुभहस्ते संपन्न संयकाळ ची महाआरती प्रसन्न विनयकुमार कोठारी यांच्या हस्ते करण्यात आली यावेळी मंडळाच्या वतीने त्यांचे सत्कार करताना गणपती ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आबड सोबत मंडळ समिती अध्यक्ष अल्केश अग्रवाल, महामंत्री दर्शीत आबड, उपाध्यक्ष धीरज धारीवाल, मयूर सावजी,रमेश दलाल,संजय तालुका,जितेश तालुका, अनुराग अग्रवाल,राहुल तालुका,सुनील अग्रवाल, श्रेणिक आबड, विजय अग्रवाल दीपाली अग्रवाल आदी

**(छाया/जावेद तंबोली)**

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिक स्व. उत्तमराव पाटील कोल्हे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जालना - प्रतिनिधी**

गुरुपिंपरी : विद्यार्थ्यांनी कष्ट, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर अभ्यास करून यश अक्षरशः खेचून आणले पाहिजे. केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे हे ध्येय न ठेवता, आपल्या मनात यशाचे स्पष्ट ध्येय ठेवून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. पुढील वर्षी होणाऱ्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात आपलाही सत्कार व्हावा, या जिद्दीने विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन प्रा. राजेंद्र भोसले यांनी केले. मराठवाडा मुक्तिसंग्राम



दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिक स्व.उत्तमराव गणपतराव पाटील कोल्हे यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ गोदावरी माध्यमिक विद्यालय, गुरुपिंपरी येथील इयत्ता दहावीच्या परीक्षेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, ट्रॉफी व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता गोदावरी माध्यमिक विद्यालय, गुरुपिंपरी येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी विद्यालय संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रभाकर मामा पवार होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. राजेंद्र भोसले, उपस्थित होते. यावेळी स्वातंत्र्य सैनिक स्व.उत्तमराव कोल्हे यांचे चिरंजीव तथा माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे स्वीय सहायक श्री. गोवर्धन उत्तमराव कोल्हे, अरविंद उत्तमराव कोल्हे, माजी सरपंच संतोष बप्पा कोल्हे, चेअरमन प्रल्हाद आण्णा कोल्हे, उपसरपंच सुनील कोल्हे, मुख्याध्यापक बी.आर. कडूळे सर, शिक्षक आर.जी.थोरात आर.एम. (पान २ वर)

# जालना समाजकार्य महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

**जालना - प्रतिनिधी**

दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्मवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील उपस्थित होते. यावेळी सर्वप्रथम डॉ. संजय लाखेपाटील यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले व यानंतर डॉ. संजय लाखेपाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. मधु खोब्रागडे व सांस्कृतिक विभाग समन्वयक प्रा. डॉ. दीपक बुक्तरे,डॉ.



बालाजी मुंडे, डॉ. सुधीर गायकवाड, डॉ. मीना बोर्डे, डॉ. नरसिंग पवार, संजय देशमुख, जगन्नाथ मलवार, प्रकाश दांडगे, अनिल हजारे, किशोर ढेकळे, शाम कांबळे, विष्णु भोसले, ऋषीं पाटील,सुमंत माने,संजय गोरे, शिवाजी भुतेकर, राम एखण्डे, संजय गाडे, चव्हाण सर आदी उपस्थित होते.

# समाजाभिमुख 'आरक्षक सेवे'चा गौरव; अमोल तांबे ठरले 'लातूर भूषण'

### *विद्यार्थी, शेतकरी, सोसायट्यांमध्ये थेट संवाद; हेल्मेट जनजागृतीसह नागरिककेंद्री उपक्रमांची नोंद*

**लातूर । प्रतिनिधी**

समाजाभिमुख पोलीस प्रशासन, पारदर्शक कार्यपद्धती आणि गुन्हेगारी नियंत्रणासोबतच सर्वसामान्यांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण करणारे लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांना यंदाचा मानाचा 'लातूर भूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखताना जनतेशी थेट संवाद साधून 'कम्युनिटी पोलिसिंग'ला नवी दिशा दिल्याबद्दल हा बहुमान त्यांना प्रदान करण्यात येत आहे.

''हा पुरस्कार माझा वैयक्तिक नसून लातूर पोलीस दलातील प्रत्येक अधिकारी-अंमलदाराचा आहे. विविध समाजाभिमुख उपक्रम यशस्वी करण्यामागे त्यांची मेहनत (पान २ वर)



# मत्स्योदरी अभियांत्रिकीमध्ये २६ जणांचे रक्तदान



**जालना - प्रतिनिधी**

शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे, मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, कर्मयोगी सहकारमहर्षी कै.अंकुशराव टोपे साहेब यांच्या ८४ व्या जयंतीनिमित्त ता.१९ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

आधार रक्तपेढी, जालना यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.

या प्रसंगी आधार रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी बाळासाहेब कठोरे, डॉ. सचिन कुटे, उपप्राचार्य प्रा. आर. एल. करवंदे, अशोक सांगळे, कृष्णा शेळके, वैष्णवी कारेगावकर, विकास कांबळे, सर्व विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. नंदकिशोर वाघ, रासेयो समन्वयक प्रा. पंकज भोयर, प्रा. उद्धव टकले, प्रा. विलास जाधव, प्रा. धनंजय देशमुख, विशाल गायकवाड, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात एकूण २६ जणांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.